लोकमत

# विद्यार्थी करताहेत सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**आळेफाटा** : क्विक हिल फाउंडेशनच्या माध्यमातून आळे येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सायबर जागरूकता अभियानांतर्गत येथील तृतीयपंथी व परिसरातील महिलांना, तसेच पिंपळवंडी येथे आशा वर्कर्सना सायबर सुरक्षितेविषयी मार्गदर्शन केले.

आळेफाटा येथील तृतीयपंथीय, तसेच परिसरातील महिलांना गौरी पादीर, विश्वजित शेळके, साक्षी डोके, विवेक खिल्लारी यांनी ओटीपी, कर्ज बँकेतील व्यवहार याबाबत होणाऱ्या फसवणुकीबाबत माहिती देत घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले. पिंपळवंडी येथेही वरद वाघ, मिसबाह इनामदार यांनी आशा वर्कर्स यांना मार्गदर्शन केले. यावेळी विभागप्रमुख प्रा. नूतन जोशी उपस्थित होत्या.

याबाबत माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांनी सांगितले की, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जुन्नर, आंबेगाव, पारनेर तालुक्यांतील शाळा, महाविद्यालय, महिला बचत गट, बसस्थानक येथे जात सायबर सुरक्षितता जनजागृती केली आहे. यापुढेही हा उपक्रम महिनाभर परिसरात राबविण्यात येणार आहे.

Hello Pune Gramin
Page No. 3 Oct 05, 2023
Powered by: erelego.com